International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No. 6 July – August 2025

# प्राकृत भाषा : जागतिक भाषा तरी वंचित भाषा- समीक्षा

**प्रा. अनंत निकम**
*विभागप्रमुख, संस्कृत विभाग, स . गा. म. कॉलेज, कराड.*
*Corresponding Author - प्रा. अनंत निकम*
**DOI - 10.5281/zenodo.18139148**

**प्रस्तावना:**

प्राकृत भाषा ही अतिशय समृद्ध भाषा आहे. गौतम बुद्ध आणि महावीर यांनी आपला संदेश याच भाषेतून दिला. हा संदेश जागतिक पातळीपर्यंत पोहोचला. भारतात उदय पावलेली ही भाषा, पण भारतातच आज तिची काय अवस्था आहे? या संदर्भात चर्चा करण्याची आवश्यकता आहे. संस्कृत- प्राकृत वाद हा काही नवीन नाही. संस्कृत आधी की प्राकृत यावर अनेक विचारवंतांनी आपली मते व्यक्त केली आहेत. प्राकृत ही दुर्लक्षित घटकांची भाषा म्हणून साहित्यामध्ये तिची नोंद घेतली गेली आहे. स्त्री -शूद्र लोक ही भाषा बोलतात असे आपल्याला आढळते. याच वेळी सभेची भाषा म्हणून संस्कृत भाषेला स्थान मिळाले परंतु प्राकृत भाषा ते स्थान प्राप्त करू शकली नाही.

प्राकृत भाषा ही राजसभेची भाषा होती का? असे अनेक प्रश्न खूपदा उपस्थित होतात. अतिशय प्रथित यश कवींनी प्राकृत भाषेचा वापर आपल्या साहित्यामध्ये केलेला आहे. संस्कृत महाका वयात सुद्धा संस्कृत-प्राकृत भाषेचा समावेश करण्यात येतो. परंतु हा समावेश करत असताना अभिजनांची आणि सामान्य लोकांची भाषा ही वेगळी असल्याचे दिसते. प्राकृत महाकाव्याला राजाश्रय होता. हे आपल्याला दोन महाकाव्याच्या उदाहरणावरून लक्षात येते. सेतुबंध हे राजा प्रवरसेन ने लिहिलेले काव्य, तसेच गौडवहो हे महाकाव्य वाक्पति या कवीला कनोज चा राजा यशोवर्म याने आपला सभा कवी केले होते. प्राकृत भाषेत महाराष्ट्र प्राकृत यात उत्कृष्ट लेखन झाले आहे. वरील दोन्ही महाकाव्ये याच प्राकृत भाषेत लिहिली गेली होती. तसेच राजा हल ने लिहिलेली गाथासप्तशती तसेच राजशेखराची काही नाटके ही महाराष्ट्र प्राकृत मध्येच लिहिली गेली आहेत. महाराष्ट्र प्राकृतला साहित्यिक भाषेची मान्यता होती हे यावरून स्पष्ट होते. असे असले तरी प्राकृत ही दुर्लक्षित भाषा होती हे स्मरणात ठेवावे लागते.

**प्रमुख उद्देश:**

1) प्राकृत भाषेचे सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजून घेणे.
2) प्राकृत भाषेचे जागतिक महत्त्व अभ्यासने.
3) प्राकृत आणि समाजातील वंचित घटक यांचा अभ्यास करणे.

संत एकनाथांनी अतिशय मार्मिक प्रश्न उपस्थित केले आहे जर संस्कृत मध्ये रचना करणारे महाकवी ठरत असतील तर प्राकृत भाषेमध्ये रचना करणाऱ्यांमध्ये काय कमी असावे. त्यांनी सहज प्रश्न विचारला आहे की जर **संस्कृत वाणी देवे केली | प्राकृत काय चोरापासून जाली**| यात एकनाथांनी स्पष्टपणे प्रश्न उपस्थित केला आहे की जर संस्कृत देवाने निर्माण केली असेल तर प्राकृत काय चोराने निर्माण केली का? ज्यावेळेस आपण वंचितांचा शोध भारतीय भाषांमधून घेतो त्याच वेळेस या ठिकाणी आपल्याला लक्षात घ्यायला हवं की भारतामध्ये अशी ही परिस्थिती होती की ज्यामध्ये केवळ भारतातील काही मनुष्य समाजच वंचित होते असं नाही तर पूर्ण एक भाषाच आपण वंचित म्हणून घोषित केली होती. याच विषयाचा सांगोपांग विचार करण्यासाठी प्रस्तुत विषयांमध्ये प्राकृत भाषा त्या भाषेचे वैभव त्या भाषेमध्ये असलेलं तिचा जागतिक प्रभाव, त्याचप्रमाणे ती भाषा का वंचित ठरवण्यात आली? तर अशा पद्धतीने एक भाषा ज्यावेळेस वंचित ठरवली जाते त्यावेळेस त्या वंचित भाषेचा जागतिक प्रभाव हा नेमका कोणत्या परिमाणामध्ये मोजायचा ते सुद्धा बघावे लागेल.

प्राकृत ही मध्यभारोपिय भाषा कुळातील एक भाषा आहे. प्राकृत भाषा ही संपूर्ण दक्षिण आशिया भागामध्ये आपला प्रभाव स्पष्टपणे दाखवणारी भाषा आहे. श्रीलंका देशात जी भाषा बोलली जाते ती म्हणजे सिंहली भाषा. या भाषेचे जे संबंध प्राकृत भाषेशी आहे ते त्या देशात बौद्ध धर्माचा जो प्रसार झाला त्यामुळे त्यात एक वैशिष्ट्यपूर्ण संबंध निर्माण झालेत. अशाप्रकारे अनेक देशांमध्ये आपल्याला प्राकृतचा प्रभाव दिसतो. साहित्य आणि धर्म त्यावर प्राकृतचा प्रभाव निश्चितपणे दिसतो.

बौद्ध धर्माचे भारतातून उच्चाटन झाले परंतु याचा प्रभाव आधी सांगितल्याप्रमाणे संपूर्ण दक्षिण आशिया देशांमध्ये होता. मागधी बोली भाषेमध्ये बौद्ध धर्मातील धर्मग्रंथांमुळे प्राकृतचा प्रभाव हा दक्षिण आशियाई देशांमध्ये ठळकपणे जाणवतो.

धर्म ग्रंथासाठी प्राकृत भाषा ही बौद्ध धर्म आणि जैन धर्म या दोन मुख्य धर्माने वापरली आहे. बौद्ध साहित्याची भाषा ही पाली आहे. जैन साहित्याचा प्रभाव पूर्ण भारतभर आणि भारताच्या बाहेर काही देशांमध्ये दिसतो त्यात अर्धमागधी किंवा जैन महाराष्ट्र प्राकृत, जैन शौरसेनी, अपभ्रंश प्राकृत या प्राकृत भाषांचा समावेश होतो.

**नाट्य:**

नाट्य वाङ्मयात प्राकृत ठळकपणे वापरल्याचे दिसते. यात या तीन भाषांचा समावेश होतो प्रथम महाराष्ट्री प्राकृत, अश्वघोशाच्या नाटकातील अर्धमागधी भाषेचा वापर असल्याचं निश्चितपणे दिसते. यात ढक्की नावाची प्राकृत भाषा आहे जी गौण बोली म्हणून येते. नाट्य शास्त्राने काही मूलभूत नियम भाषेच्या संदर्भात केलेत. या नियमांमुळे साहित्य निर्मितीमध्ये मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध झालीत. त्यामुळे नाट्यरचनेमध्ये प्राकृत भाषांना स्थान आहे. त्याला एक रूढ संकेत असल्याचे विद्वान मानतात. उदाहरणार्थ गद्य

लेखनासाठी 'शौरसेनी भाषा' वापरावी असे भरताच्या नाट्यशास्त्रात आहे. गीत लेखनासाठी किंवा काव्यासाठी 'महाराष्ट्र प्राकृत' चा वापर करावा असे भारताचे नाट्यशास्त्र म्हणते तसेच विशिष्ट जातींसाठी विशिष्ट प्राकृत ही व्यवस्था भाषिक दृष्टिकोनातून न पाहता ती निश्चितपणे समाजाची तत्कालीन रूढ व्यवस्था पाहून केलेली असावी.

**प्राकृत व्याकरण:**

भाषेमध्ये व्याकरण हे अतिशय महत्त्वाचे असते. बोलीला तिचे व्याकरण नसते असे म्हटले जाते. परंतु प्राकृत ही बोलीभाषा तसेच ग्रंथांची भाषा होती. प्राकृत व्याकरणाचे अनेक ग्रंथ आहेत. प्राकृत व्याकरणकारांनी वर्णन केलेल्या महाराष्ट्रीय शौरसेने, मागधी, पैशाची, चुलीका पैशाची, अपभ्रंश आणि इतर दुय्यम प्रतीच्या बोली येतात त्या बोली या एक वैशिष्ट्यपूर्ण व्याकरणाच्या नियमांनी बांधल्या गेलेल्या होत्या किंवा त्या संदर्भातले नियम हे प्राकृत भाषेच्या व्याकरण ग्रंथात दिसते.

प्राकृत भाषांचे व्याकरण परंपरा महत्त्वाचे आहे ही परंपरा आचार्य वररूची पासून सुरू होते. आचार्यांचा 'प्राकृत प्रकाश' हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्यात महाराष्ट्र प्राकृत, शौरसेनी प्राकृत, मागधी प्राकृत व पैशाची प्राकृत यांचा अभ्यास आहे. हेमचंद्राच्या ग्रंथात चुलीका पैशाची, अपभ्रंश व आर्ष या प्राकृत भाषांचा उल्लेख दिसतो. इतर काही व्याकरणकारांनी यातील आर्ष भाषा सोडून बाकी इतर सहा भाषांचा विचार केलेला दिसतो. आर्ष भाषेचा उल्लेख फारसा आढळत नाही. परंतु आर्ष महाकाव्य हे संस्कृत मध्ये प्रसिद्ध आहेत हे सर्वांना माहिती आहे.

मार्कंडेयाच्या प्राकृत सर्वस्वामध्ये 16 भाषांचा विचार असून त्याने भाषा, विभाषा, अपभ्रंश व पैशाचं असे भाग केले आहेत. यात महाराष्ट्र, शौरसेनी, प्राच्चा, अवंती, मागधी, अर्धमागधी दक्षिणात्या व बहालिकी या भाषा शाकाहारी चांडाली, शाबरी अभिरगी व द्राविडी या विभाशा असे 27 प्रकार असलेली अपभ्रंश आणि अकरा प्रकार असलेली पैशाची चा उल्लेख केलेला आहे. वररुचीपासून पुढे कित्येक शतके अनेक व्याकरणकारांनी प्राकृत व्याकरणावर बरेच लिखाण केलेले दिसते.

**प्राचीन शिलालेख:**

शिलालेखीय प्राकृत हा एक महत्त्वाचा भाग आहे. सम्राट अशोकाचे शिलालेख सर्व भारतभर आणि श्रीलंकेच्या काही भागात देखील उपलब्ध होतात. लेणी, ताम्रपट, नाणी यांसारख्या साधनांवर सुद्धा प्राकृत भाषा निश्चितपणे पाहायला मिळते. लौकिक संस्कृत व्याकरणाने स्थिर केलेली पंडित मान्य संस्कृत अस्तित्वात आल्यावर सुद्धा त्या संस्कृतच्या नियमांना न मानता लोक व्यवहारात आणि बौद्ध-जैन व काही हिंदूंच्याही ग्रंथात आढळणारी नियम मुक्त संस्कृत भाषा येते. प्राकृत भाषेच्या प्रभावामुळे हे झाल्याचे दिसते.

काही प्राचीन शिलालेख 'संस्कृत' भाषेमध्ये आढळतात परंतु त्यात निश्चितपणे काही

'प्राकृत' शब्द आणि वाक्य आढळतात. त्या काळात प्राकृत प्रभाव होता असे ठळकपणे दिसते आणि या शिलालेखांवरून असे म्हणू शकतो की संस्कृत आणि प्राकृत या एकाच वेळेस अस्तित्वात असलेल्या भाषा होत्या. काही विद्वान याला 'सहोदर'भाषा असे देखील म्हणतात. या शिलालेखांवरून एकाच वेळेस संस्कृत आणि प्राकृत ही व्यवहाराची आणि राजकारणाची भाषा होती हे निश्चितपणे लक्षात येते. पण तरीसुद्धा पुढील काळामध्ये संस्कृत भाषेचा प्रभाव वाढला आणि प्राकृत भाषेचा प्रभाव कमी कमी होत गेला. किंबहुना नंतरच्या काळामध्ये तो प्रभाव राहिलाच नाही. ती वंचितांची भाषा झाली आणि म्हणून वंचितांचे जे जे साहित्य आहे ते ते साहित्य ते ज्या भाषेत आहेत ती भाषा देखील वंचित झाली आणि त्यामुळे तत्कालीन समाज जीवनाचे पाहिजे तसे वर्णन आपल्याला उपलब्ध होऊ शकले नाही.

प्रस्तुत लेखामध्ये मात्र दक्षिण आशियामध्ये प्राकृतचा प्रभाव कसा होता? किती होता? याचा विचार करणार आहोत. त्याच अनुषंगाने टॉम हुगरवोट्स यांनी प्राकृत भाषेच्या 101 संकल्पना आणि त्या संकल्पनेचा संपूर्ण दक्षिण आशियावर काय प्रभाव आहे त्याचा अभ्यास केलेला आहे. पाली भाषा दक्षिण आशिया देशांमध्ये महत्त्वाची भाषा आहे आणि ही पालीभाषा प्राकृत भाषेच्या समूहातीलच एक भाषा आहे आणि त्यात थेरवात बौद्ध संप्रदाय हा आपल्याला लावून कंबोडिया थायलंड म्यानमार या देशांमध्ये जो आहे तर त्यात आपल्याला पाली भाषेचं साहित्य आणि थेरवाद बौद्ध संप्रदाय हा पसरलेला दिसतो आणि याचा प्रभाव आपल्याला पूर्ण या देशांमध्ये पाहता येतो.

श्रीलंकेतही ख्रिस्त पूर्व 200 ते ख्रिस्तोत्तर चौथ्या पाचव्या शतकापर्यंत ब्राह्मणी शिलाले आढळतात त्यांच्या भाषेला सिंहली प्राकृत असेच म्हणतात भारतात अशोक नंतरही जवळ जवळ एक हजार वर्षापर्यंत ही परंपरा काही प्रमाणात टिकून असल्याचे आढळते.

प्राचीन काळातील काही नाणी उपलब्ध झालेली आहेत साधारणतः ख्रिस्त पूर्व चौथ्या शतकापासून ही नाणी उपलब्ध आहेत. यात धम्मपालस असं उजवीकडून डावीकडे कोरलेले दिसते. प्राकृत लेख असलेल्या नाण्यांची ही परंपरा ख्रिस्त पूर्व चौथ्या शतकाच्या उत्तरार्धापासून गुप्तकाळापर्यंत अखंड चालू राहिल्याचं आपल्याला आढळतं यावरून प्राकृत भाषा ही किती संपन्न होती हे लक्षात येतं आणि नंतरच्या काळामध्ये तिचा किती ऱ्हास झाला हे ठळकपणे या ठिकाणी नमूद करण्याचा मानस आहे आणि याच उद्देशाने संपूर्ण भाषा कशी वंचित ठरली हे यातून मला पुन्हा सांगायचे आहे.

आज उपलब्ध न होऊ शकलेली बृहत कथा ही ग्रंथरचना गुणाढयची मांडली जाते ती पैशाची प्राकृत मध्ये आहे पैशाची प्राकृत ही पिशाच्च लोकांची भाषा म्हणून तिचा तिरस्कार केला जातो. बौद्ध संप्रदायाच्या चार शाखांपैकी एका शाखेतील ग्रंथांचे लेखन पैशाची प्राकृतात असल्याचे उल्लेख आढळतात परंतु ते आज

उपलब्ध नाही त्यामुळे नेमका त्याचा अभ्यास होऊ शकत नाही.

**निष्कर्ष :**

प्राकृत भाषा ही भारताचीच भाषा नव्हे तर ती जागतिक भाषा आहे. जगाची भाषा होण्याची क्षमता या भाषेत आहे. परंतु आजही या भाषेला वंचितांची भाषा समजले जाते. भाषेची अशी विभागणी होणे हे भाषेच्या विकासासाठी आणि वाढीसाठी घातक असते असे आधुनिक भाषाशास्त्र मानते. परंतु आज ही मी हा लेख लिहीत असे पर्यंत ऑक्सर्फड विद्यापीठ या भाषेला वंचित मानते आहे. सांप्रत प्राकृत भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे . या भाषेच्या अभ्यासाला या मुळे गती मिळेल. प्राकृत भाषेत वेगवेगळया समाज घटकांचे सलोख्याचे संबंध होते हे दिसते. प्राकृत भाषेच्या अभ्यासामुळे हे वंचित जीवन अभ्यासण्यास मदत होणार आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


1) डॉ. करंबेळकर , वि. वा.- "संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास", श्री शारदा प्रकाशन , नागपूर , १९५४
2) डॉ. जैन, जगदीशचंद्र - "प्राकृत साहित्य का इतिहास", चौखंबा प्रकाशन, वाराणसी, १९६१.
3) Katre, S. M. "*Prakrit Languages and Their Contribution to Indian Culture*", Poona, 1964
4) Limaye, S. P. India's Relations With Southeast Asia Take A Wing. Southeast Asian Affairs, 39–51. 2003.
5) Smith, Caley. "The Dialectology of Indic." Handbook of Comparative and Historical Indo-European Linguistics, vol.1, Eds. Jared Klein, Brian Joseph, and Matthias Fritz. De Gruyter Mouton, 417-47. 2017